# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 21.02.2025** **वार- शुक्रवार**

---

**साहित्य संमेलन**

98व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचं उद्घाटन सध्या राजधानी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होत आहे. केंद्र सरकारनं नुकताच मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला; त्या पार्श्वभूमीवर पुण्यातील सरहद संस्थेनं राजधानीत या संमेलनाचं आयोजन केलं आहे. संमेलनाचे स्वागताध्यक्ष ज्येष्ठ नेते शरद पवार, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, तसंच या संमेलनाच्या नियोजित अध्यक्ष डॉक्टर तारा भवाळकर उद्घाटन सोहळ्याला उपस्थित आहेत. दिल्लीतल्या तालकटोरा मैदानावर उभारण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज साहित्य नगरीत पुढचे तीन दिवस हा साहित्यमेळा रंगणार आहे. संमेलनाच्या पार्श्वभूमीवर आज सकाळी भव्य ग्रंथदिंडी काढण्यात आली. पारंपरिक वेशभूषेतील मराठीजन, आणि 'अभिजात मराठी'च्या जयघोषाने तालकटोरा स्टेडियमचा परिसर मराठीमय झाला होता.

**अमित शहा-जयकुमार गोरे**

केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा उद्या पुणे दौऱ्यावर येत आहेत. गृह मंत्रालयाच्या पश्चिम विभागीय परिषदेच्या 27व्या बैठकीचं अध्यक्षस्थान ते भूषवणार आहेत. महाराष्ट्र, गुजरात, आणि गोवा या राज्यांसह दादरा आणि नगर हवेली आणि दमण आणि दीव या केंद्रशासित प्रदेशांचे मुख्यमंत्री, प्रशासक, वरिष्ठ मंत्री आणि वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी या परिषदेला उपस्थित राहणार आहेत. लैंगिक शोषण, महिला अत्याचारांच्या प्रकरणांच्या जलद तपासासाठी जलदगती विशेष न्यायालयांची स्थापन करणं, आपत्कालीन प्रतिसाद समर्थन प्रणालीची अंमलबजावणी, पायाभूत सुविधांशी संबंधित मुद्दे, यासह विविध मुद्द्यांवर या परिषदेत विचारमंथन अपेक्षित आहे. आपल्या पुणे दौऱ्यात अमित शहा जनता सहकारी बँकेच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या सांगता समारंभालाही उपस्थित राहणार आहेत. तसंच प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजनेच्या दुसऱ्या टप्प्यातील पुणे जिल्ह्यातील लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात मंजुरी पत्र वितरण तसंच राज्यातील 10 लाख लाभार्थ्यांना पहिल्या हप्त्याचं वितरण अमित शहा यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी आज पुण्यात पत्रकार परिषेदत याबाबत माहिती दिली. बालेवाडी इथल्या क्रीडा संकुलात होणाऱ्या या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडवणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

**पिंपरी चिंचवड**

पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांनी आज 2025-26 या आर्थिक वर्षासाठीचं 6 हजार 256 कोटी 39 लाख रुपयांचं अंदाजपत्रक सादर केलं. या अंदाजपत्रकात कुठलीही करवाढ नसल्याने नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. यंदापासून प्रथमच हवामान अर्थसंकल्पही सादर करण्यात आला असला तरी याच्या तरतुदी पुढील अंदाजपत्रकात असतील असं शेखर सिंह यांनी सांगितलं.

**कृषी बैठक**

प्रधान कृषी सचिव विकासचंद्र रस्तोगी यांच्या अध्यक्षतेखाली आज कृषी विभागाची आढावा बैठक झाली. राज्यात ॲग्रीस्टॅक योजनेत आतापर्यंत 55 लाख शेतकऱ्यांची नोंदणी पूर्ण झाली आहे. उर्वरित शेतकऱ्यांच्या नोंदणीत येणाऱ्या अडचणींवर विचार-विनिमय करण्यासाठी कृषी आणि महसूल विभागाची संयुक्त बैठक घेऊन निर्णय घेण्यात येईल, असं रस्तोगी यांनी यावेळी सांगितलं.

**परिषद**

राज्य कृषी पणन मंडळाच्यावतीने येत्या 24 तारखेला पुण्यात बाणेर इथं राज्यस्तरीय परिषदेचं आयोजन करण्यात येणार आहे. उपमुख्यमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते या राज्यस्तरीय परिषदेचं उद्घाटन होणार आहे. पणनमंत्री जयकुमार रावल यांच्यासह अन्य मान्यवर या परिषदेला उपस्थित राहणार आहेत.

**विद्यापीठ**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये 23 फेब्रुवारीपासून तीन दिवस राज्यस्तरीय 'उत्कर्ष' सामाजिक सांस्कृतिक महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. राज्यभरातील 16 विद्यापीठांमधील राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवक विद्यार्थ्यांचे संघ या स्पर्धेत आपल्या विविध कलागुणांचा आविष्कार करणार आहेत.

**जीबीएस**

पुण्यात आतापर्यंत जीबीएसचे 211 रुग्ण आढळून आले त्यापैकी 144 रुग्णांवर यशस्वी उपचार झाले असून सध्या 56 रुग्णांवर उपचार सुरू आहेत. या आजारामुळे 11 रुग्णांचा मृत्यू झाला आहे.

**निधन**

माजी विक्रीकर अधिकारी रंगनाथ उर्फ विलास दडपे यांचं काल पुण्यात वृद्धापकाळानं निधन झालं. ते 84 वर्षांचे होते.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज आकाश निरभ्र होतं. कमाल 35 तर किमान 14 पूर्णांक 9 दशांश अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. उद्याही तापमानात फारसा बदल संभवत नसल्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**